


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ८० वा | सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR




# शेतकऱ्यांपुढे दुहेरी संकट; माणसांसह जनावरांच्या जगण्याचा संघर्ष

## सोलापूर जिल्ह्यात चारा संकटाची टांगती तलवार; पशुधन जगवायचे कसे?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदा पावसाने पाठ फिरवल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईसोबतच १८ लाख १७ हजार ६५२ पशुधनाला कसे जगवायचे, हा अत्यंत जिकिरीचा आणि अस्वस्थ करणारा प्रश्न बळीराजासमोर उभा ठाकला आहे.

संपूर्ण जिल्ह्यात उपलब्ध असलेला चाऱ्याचा साठा अवघे ४७ दिवस (सुमारे १.५ महिने) पुरेल इतकाच शिल्लक राहिला आहे. त्यामुळे दारात बांधलेल्या मुक्या जनावरांवर उपासमारीची वेळ आल्याने चिंतेचे ढग दाटले आहेत.



जिल्ह्यात सर्वाधिक चिंताजनक स्थिती माळशिरस तालुक्याची आहे.
२ लाख ७९ हजारांहून अधिक पशुधन असलेल्या या तालुक्यात दिवसाला तब्बल ३ हजार २५१ मेट्रिक टन चाऱ्याची गरज आहे. केवळ २१ दिवस (तीन आठवडे) पुरेल इतकाच चारा शिल्लक आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात अवघा २७.५ दिवसांचा आणि बार्शी तालुक्यात ३१.४ दिवसांचा साठा शिल्लक राहिला आहे.
सांगोला (३७.९ दिवस), मंगळवेढा (४४.६ दिवस), माढा (४६.१ दिवस), करमाळा (४९.२ दिवस) आणि उत्तर सोलापूर (५० दिवस) या तालुक्यांमध्ये चाऱ्याची उपलब्धता दीड महिन्याच्या आसपास आहे. त्यामुळे एका महिनाभरात जिल्ह्यामध्ये चाऱ्याची भीषण टंचाई उद्भवण्याची भीती व्यक्त होत आहे.
पंढरपुरात सर्वाधिक म्हणजे ८९.२ दिवस (३ महिने) आणि अक्कलकोटमध्ये ८४.५ दिवस (२.८ महिने) पुरेल इतका चारा उपलब्ध असल्याने तूर्तास काहीसा दिलासा आहे.

> चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाकडून तयारी करण्यात येत आहे. चारा लागवडीसाठी तीन कोटी रुपयांचे बियाणे वाटप करण्यात आले आहे. सिंचन क्षेत्रात आणि उजनी धरण क्षेत्रात प्रामुख्याने चारा लागवड करण्यावर भर देण्यात येणार आहे. कोणत्याही परिस्थितीत जनावरांना चारा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.
>
> **– कुशल जैन,** मुख्य कार्यकारी अधिकारी.

**दैनंदिन गरज २१ हजार टनांची, साठा मात्र अपुरा**

जिल्ह्यात ९ लाख ८२ हजार ६३० मोठी जनावरे (गाई, म्हशी, बैल) आणि ८ लाख ३५ हजार २२ लहान जनावरे (शेळ्या, मेंढ्या) मिळून १८,१७,६५२ पशुधन आहे. या पशुधनांसाठी दररोज २१,०२७.५ मेट्रिक टन चाऱ्याची आवश्यकता भासते. पेरणीच्या उपलब्ध दरानुसार जिल्ह्यात आजघडीला एकूण ९,८८,८७९ मेट्रिक टन चारा उपलब्ध आहे. हा साठा पुढील अवघ्या ४७ दिवसांत (१.५ महिने) पूर्णपणे संपुष्टात येणार आहे.

**तालुकानिहाय आकडेवारी**
**अन चाऱ्याची उपलब्धता**

तालुका : जनावरांची संख्या : चाऱ्याची उपलब्धता (मे. टन).
– माळशिरस : २७९,४७४ : ६८,३७७ – दक्षिण सोलापूर : ९५,८६३ : २८,३१२ – बार्शी : १०१,९२६ : ३७,८८५ – सांगोला : ३१५,१२० : १३३,४६५ – मंगळवेढा : १७२,५६५ : ८६,५५७ – माढा : १९१,४८१ : १००,७१३ – करमाळा : १४६,३१८ : ८६,५५५ – उत्तर सोलापूर : ४९,९५४ : ३०,५१५ – मोहोळ : १६४,५९० : १२४,५९७ – अक्कलकोट : २३,६७३ : ७७,१७८ – पंढरपूर : २०६,६८८ : २१४,७२५ – एकूण सोलापूर : १८,१७,६५२ : ९,८८,८७९

# श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळातर्फे भव्य ब्रतुकम्मा महोत्सवाचे आयोजन

## पारंपरिक वेशभूषा, फुलांची आकर्षक सजावट आणि लोकगीतांनी रंगणार उत्सव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माधवनगर येथील श्री साईबाबा मंदिर परिसरात श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गेल्या पंधरा वर्षांपासून ब्रतुकम्मा महोत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा केला जात आहे. यंदाही या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, पारंपरिक वेशभूषा, लोकगीते, फुलांची आकर्षक सजावट आणि सामूहिक नृत्याच्या माध्यमातून तेलंगणा संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. अशी माहिती माधवी अंदे आणि नंदिनी कोंडूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ब्रतुकम्मा हा तेलंगणातील महिलांचा पारंपरिक आणि लोकप्रिय सण आहे. 'ब्रतुकम्मा' या शब्दाचा अर्थ 'जिवंत राहा, फुला-फळा' असा होतो. या सणात विविध रंगीबेरंगी फुलांची आकर्षक रचना करून तिची मनोभावे




पूजा केली जाते. महिला पारंपरिक गीते म्हणत ब्रतुकम्माभोवती फेर धरून नृत्य करतात. निसर्ग, फुले आणि मातृशक्तीचा सन्मान करणारा हा सण तेलुगू संस्कृतीचे प्रतीक मानला जातो.

सोलापूर परिसरातील तेलुगू भाषिक समाजाच्या मुळाशी तेलंगणातील ही परंपरा जोडलेली असल्याने येथील



महिलांमध्येही या सणाबद्दल विशेष उत्साह पाहायला मिळतो. महिलांच्या या आवडत्या पारंपरिक सणाला आधुनिक युगातही टिकवून ठेवण्यासाठी श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने सन २०१२ पासून विविध उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात महोत्सवाचे आयोजन केले जात आहे.

श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने होणाऱ्या या महोत्सवात सुमारे ५०० महिला सहभागी होणार आहे. ब्रतुकम्मा हा तेलंगणातील महिलांचा लोकप्रिय पारंपरिक सण आहे.

ब्रतुकम्मा महोत्सवाला आधुनिकतेची जोड देत आकर्षक लायटिंग तसेच नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात येते. उत्कृष्ट ब्रतुकम्मा सजावट करणाऱ्या महिलांना महोत्सवात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून पारंपरिक सण आणि तेलुगू संस्कृतीची समृद्ध परंपरा जतन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मंडळाच्या वतीने केला जात आहे.

तेलंगणामध्ये ब्रतुकम्माचे नदी किंवा तलावामध्ये विसर्जन करण्याची परंपरा आहे. मात्र, शहरी भागात नदी-तलाव लांब असल्याने महिलांची गैरसोय होऊ नये आणि पर्यावरणाचेही संरक्षण व्हावे, यासाठी मंडळाच्या वतीने कृत्रिम विसर्जन कुंड तयार करण्यात आले आहे. त्यामुळे महिलांना सोयीस्कररीत्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करता येणार आहे.

दरवर्षी श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या महोत्सवाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, ब्रतुकम्माची आकर्षक सजावट करून सहभागी होणाऱ्या महिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

या पत्रकार परिषदेला संस्थेचे अध्यक्ष अनिल कोंडूर, अश्विनी चाटला, सविता गजरे, शालिनी जल्ला, विजयालक्ष्मी कोळा, सुदर्शन बोल्लम राजशेखर येमुल, बाळकृष्ण जाधव, आनंद श्रीपुरम, रमेश पेंडम, अनिल आडम, अमर बोलबत्तीन, राजशेखर बत्तुल, अरविंद यनगंदुल, व्यंकटेश अप्पम, नागनाथ बोलाबत्तीन, श्रीनिवास कोंडा, दशरथ पेंटी, वेंकटरमण कोंडूर, रमेश बत्तुल, लक्ष्मण येमूल, गोवर्धन चिप्पा, उमेश पामुल, श्रीनिवास कोंडा, अनिल नल्ला, प्रकाश वन्नम, गोवर्धन चिप्पा, श्रीकांत यनगंटी, विघ्नेश दोरणाल, अर्जुन यल्ला, राजू मंचीकटला, श्रीनिवास नल्ला आदी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट अधिकच गडद

## 139 गावे आणि 752 वाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गडद होत असून, टंचाईग्रस्त भागातील नागरिक आणि पशुधनला पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाकडून टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.

१६ ऑक्टोबर रोजीच्या स्थितीनुसार जिल्ह्यातील १३९ गावे आणि ७५२ वाड्यांमधील २ लाख ६२ हजार ४४९ नागरिकांना तसेच ९५ हजार ९३२ पशुधनला १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

पाणीटंचाई निवारणासाठी जिल्ह्यातील ४० विहिरी आणि २१ बोरवेल असे एकूण ६१ जलस्रोत अधिग्रहण करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. मंगळवेढा आणि सांगोला तालुक्यात सर्वाधिक टँकर सुरू असून, या दोन तालुक्यांमध्ये मिळून ७४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

### १३९ गावांना १३५ टँकरने पाणीपुरवठा



तालुकानिहाय आकडेवारीनुसार, मंगळवेढा तालुक्यातील ३७ गावांसाठी ४० टँकर सुरू आहेत. सांगोला तालुक्यातील २६ गावांना ३४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. माढा तालुक्यातील १४ गावांसाठी १६, माळशिरस तालुक्यातील १० गावांसाठी १०, तर करमाळा तालुक्यातील १२ गावांसाठी नऊ टँकर सुरू आहेत. अक्कलकोट तालुक्यातील १५ गावांसाठी आठ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील पाच गावांसाठी सात, दक्षिण सोलापूर तालुक्यातील पाच गावांसाठी सहा, बार्शी तालुक्यातील १३ गावांसाठी तीन, तर मोहोळ तालुक्यातील दोन गावांसाठी दोन टँकर सुरू आहेत.

त्यामुळे जिल्ह्यातील टँकरद्वारे होणाऱ्या एकूण पाणीपुरवठ्यात या दोन्ही तालुक्यांचा मोठा वाटा आहे. जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर यांनी ही माहिती दिली. टंचाईग्रस्त गावांमध्ये नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून नियमित पाणीपुरवठा सुरू असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**६१ जलस्रोतांचे अधिग्रहण**

टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याबरोबरच टंचाईग्रस्त भागात पयार्यी जलस्रोत उपलब्ध करून देण्यावरही प्रशासनाचा भर आहे. त्यानुसार जिल्ह्यात ४० विहिरी आणि २१ बोरवेल अधिग्रहण करण्यात आल्या आहेत. या जलस्रोतांमुळे संबंधित भागातील पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यास मदत होत आहे.

# आरोपांच्या वादळातही चारित्र्यावर विश्वास; २० ऑक्टोबरला नारायणगडावर चला !

## मनोज जरांगे पाटील यांच्या सांगाव्यानंतर सोलापुरातील सकल मराठा समाजाचे समाजबांधवांना आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** आरोप-प्रत्यारोप, अफवा आणि विविध चर्चांच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या सांगाव्यानुसार, येत्या मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी नारायणगड येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा समाज, सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'आरोपांच्या वादळातही डगमगणार नाही, कारण विश्वास आहे स्वतःच्या चारित्र्यावर!' या ठाम भूमिकेतून दसरा मेळाव्याचे आवाहन करण्यात आले आहे. आरोप करणारे अनेकजण भेटतील, अफवा पसरवणारेही कमी नाहीत; मात्र सत्याला पुराव्याची आणि चारित्र्याला स्वच्छतेची ताकद असते, असा संदेश या आवाहनातून देण्यात आला आहे. व्यक्तीची खरी ओळख तिच्यावर होणाऱ्या आरोपांवरून नव्हे, तर तिच्या कर्तृत्वावरून ठरते, असा ठाम विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यभरात सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर नारायणगड येथील दसरा मेळाव्याला समाजाच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे. या मेळाव्यातून समाजाची एकजूट, संघटनात्मक ताकद आणि पुढील वाटचालीबाबत कोणता संदेश दिला जातो, याकडे समाजबांधवांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील मराठा समाजातील नागरिकांनी मेळाव्याला उपस्थित राहून आपली एकजूट दाखवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



**'चलो नारायणगड'चा नारा**

सकल मराठा समाज, सोलापूर यांच्या आवाहनात 'चलो नारायणगड' हा नारा देण्यात आला आहे. मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता नारायणगड येथे दसरा मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मनोज दादा जरांगे पाटील यांचा सांगावा आल्याचे नमूद करत समाजबांधवांनी या आवाहनाला प्रतिसाद द्यावा, असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

> 'लढेंगे, जितेंगे — हम सब जरांगे!' या घोषणेसह सकल मराठा समाज, सोलापूर यांनी समाजबांधवांना नारायणगड येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.
>
> **— सकल मराठा समाज,** सोलापूर

आरोपांच्या गदारोळातही सत्य, स्वच्छ चारित्र्य आणि कर्तृत्व यांवरील विश्वास कायम ठेवण्याचा संदेश या आवाहनातून देण्यात आला आहे. समाजाच्या प्रश्नांवर एकत्र येणे, संघटित राहणे आणि आपल्या भूमिकेवर ठाम राहणे, या भावनेतून दसरा मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




## ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने पालकमंत्री गोरे यांचा वाढदिवसानिमित्त विशेष सन्मान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन वाढदिवसानिमित्त जाहिरात, बॅनरबाजी आणि अन्य अनावश्यक खर्च टाळून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याचे आवाहन ग्रामविकासमंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत ईच्छा भगवंताची नवरात्रोत्सव मंडळाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तब्बल २ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमाबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे



यांचा शनिवारी विशेष सन्मान करण्यात आला पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शनिवारी हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित बैठकीसाठी पालकमंत्री गोरे उपस्थित होते.

यावेळी सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ चे भाजपा नगरसेवक किसन जाधव यांनी ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने त्यांना कमळाचे फूल, बजरंग बलीची मूर्ती आणि सोलापूरची ग्रामदेवता श्री रूपाभवानी देवीचा प्रसाद देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मनोगत व्यक्त करताना पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, माझ्या वाढदिवसानिमित्त ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेत तब्बल दोन लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. वाढदिवसावर अनावश्यक खर्च करण्याऐवजी गरजू शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचा मंडळाचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे संकटाच्या काळात शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. या उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले

यावेळी नगरसेविका चैत्रालीताई शिवराज गायकवाड,कल्पनाताई कदम,सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड, श्रीकांत गिड्डे यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी उपस्थित होते.



## संपादकीय

# 'एसआयआर' मतदारांच्या समावेशासाठी की नावे वगळण्यासाठी?

सर्व प्रकारच्या निवडणुका मतदारयादीच्या आधारे घेतल्या जात असल्याने ती अचूक आणि अद्ययावत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मतदारयादीचे नियमित पुनरीक्षण करणे हे तिची अचूकता टिकवून ठेवण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रिया अधिक विश्वासार्ह बनवण्यासाठी आवश्यक आहे.

त्यामुळे लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम २१ आणि मतदार नोंदणी नियम, १९६० (Registration of Electors Rules, 1960) मधील नियम २५ यांच्या आधारे मतदारयादीचे सखोल, संक्षिप्त किंवा मिश्र पद्धतीने पुनरीक्षण करता येते. यापैकी आयोगाने विशिष्ट परिस्थितीत राबविलेल्या प्रक्रियेला विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात Special Intensive Revision (एसआयआर) किंवा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण म्हणजेच Summary Revision (एसएसआर) असे संबोधले जाते. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण हे सामान्यतः दरवर्षी होत असते आणि विशेष सखोल पुनरीक्षण हे विशिष्ट कालावधीनंतर करण्याचा निर्णय निवडणूक आयोग घेत असतो. विशेष संक्षिप्त पुनरीक्षणामध्ये अस्तित्वात असलेल्या यादीमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या जातात. विशेष सखोल पुनरीक्षणात मात्र विद्यमान यादीची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला जात असतो. महाराष्ट्रात अखेरचे विशेष सखोल पुनरीक्षण हे २००२मध्ये झालेले होते.

### एसआयआरचा कायदेशीर आधार

निवडणूक आयोगाला मतदार यादीची फेरतपासणी करण्याचा अधिकार आहे, याबद्दल फारसा वाद नाही; परंतु हा अधिकार आयोगाकडून कसा वापरला जात आहे, हा मुद्दा सध्या वादाचा विषय बनलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ अंतर्गत निवडणुकांवर देखरेख, त्यांचे संचालन आणि नियंत्रण करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. त्यास अनुसरून लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० अर्थात Representation of the People Act, 1950 मधील कलम २१ आयोगाला मतदार यादीचे संक्षिप्त पुनरीक्षण आणि आवश्यक असल्यास विशेष पुनरीक्षण करण्याची मुभा देते. या कायद्याच्या कलम २२ नुसार मतदार नोंदणी अधिकारी (Electoral Registration Officer-ERO) चुकीच्या नोंदी दुरुस्त करू शकतो, मृत किंवा स्थलांतरित व्यक्तींची नावे वगळू शकतो किंवा अन्य कारणांनी अपात्र ठरलेल्या व्यक्तींची नोंद रद्द करू शकतो. मतदार नोंदणी नियम, १९६० मध्ये पुनरावलोकन, घरोघरी जाऊन गणना करणे, दावे आणि हरकती, चौकशी आणि सुनावणी यांची रूपरेषा दिलेली आहे. परंतु अशा दुरुस्त्या करीत असताना एखाद्या मतदाराचा अधिकार बाधित होत असल्यास वरील कायद्यामध्ये त्याला वाजवी सुनावणीची संधी देण्याची तरतूद देखील करण्यात आलेली आहे.

याचा अर्थ एसआयआरमध्ये करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा तपशील कायदा व नियम यांत नमूद तरतुदीनुसार आहे, यात शंका नाही. परंतु प्रश्न इतकाच आहे की, या अधिकाराचा वापरात कायद्याचा उद्देश, अर्थ आणि नैसर्गिक न्यायाची तत्त्वे कितपत पाळली गेली?

### एसआयआर म्हणजे पडताळणी की पात्रतेची फेरपरीक्षा?

मतदार नोंदणी नियम, १९६० मधील एसआयआरची संकल्पना पाहिली, तर तिचा भर निवडणूक आयोगाद्वारे मतदार यादीच्या पडताळणीवर आणि त्या आधारे सदर यादीच्या करण्यात येणाऱ्या पुनर्रचनेवर असल्याचे स्पष्ट होते. आयोगाचे अधिकारी घरोघर जाऊन मतदारांसंबंधी माहिती गोळा करून त्यांची पडताळणी करतील आणि त्याआधारे आवश्यक ती कारवाई करतील, असे या पडताळणीत अभिप्रेत असल्याचे दिसून येते. परंतु राजकीय निरीक्षकांच्या मते, आयोगाचे अधिकारी या प्रक्रियेशी तितकेसे प्रामाणिक राहिले नाहीत. बिहारच्या एसआयआर प्रक्रियेत बूथस्तरीय अधिकाऱ्यांनी चौकशीदरम्यान मतदारांनी दिलेल्या माहितीच्या पुष्टीसाठी अतिरिक्त कागदपत्रे मागितलेली आहेत, अशा तक्रारी आलेल्या होत्या. असे करून आयोग जणू काही सांगत होता की, "प्रथम स्वतःची पात्रता सिद्ध करा; अन्यथा तुमचे मतदार असणेच संशयाच्या कक्षेत येऊ शकते." यामुळे साधी पडताळणी आणि पात्रतेची पुनर्परीक्षा यांतील सीमा धूसर झाल्याचा आरोप करण्यात आला. मात्र निवडणूक आयोगाने हा आरोप फेटाळून लावला. आयोगाच्या म्हणण्यानुसार कोणत्याही मतदाराचे नाव वगळण्याचा अंतिम निर्णय घेण्यापूर्वी योग्य ती प्रक्रिया पाळली जाते.

### विद्यमान मतदारांची वैधता

एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत आधीपासून आहे. ती अनेक निवडणुकांत मतदान करत आली आहे. याचा अर्थ, ती वैध मतदार आहे, हे पूर्वी मान्य केले गेलेले आहे. अशा परिस्थितीत तिच्या मतदार असण्याचा अधिकार सामान्यतः वैध असल्याचे गृहीत धरणे आवश्यक आहे. हे गृहीतक नाकारण्यासाठी काही ठोस पुरावे असणे अपेक्षित असते. परंतु एसआयआर प्रक्रियेत अनेक मतदारांना स्वतःची पात्रता पुन्हा एकदा नव्याने सिद्ध करावी लागत आहे. त्यामुळे मतदारांच्या मतदार म्हणून असलेल्या अधिकाराची वैधता संशयास्पद मानून त्याची पुनर्तपासणी केली जात असल्याचा आभास निर्माण होत असल्यास त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

### पुराव्यांच्या भाराचा प्रश्न

कायद्याच्या मूलभूत तत्त्वानुसार 'पुराव्यांचा भार' हा विद्यमान स्थिती बदलू इच्छिणाऱ्या पक्षावर असणे अपेक्षित असते. मतदारांचे मतदार यादीतील नाव ही एक विद्यमान कायदेशीर स्थिती आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचे नाव वगळायचे असल्यास आयोगाने तिच्या पात्रतेवर संशय निर्माण करणारे ठोस पुरावे पुढे आणणे आवश्यक आहे. एसआयआर प्रक्रियेत अनेक मतदारांच्या अपात्रतेचे कोणतेही ठोस पुरावे न देता, त्यांच्याकडूनच स्वतःची पात्रता सिद्ध करण्याची अपेक्षा ठेवण्यात येत आहे. त्यामुळे पुराव्याचा भार आयोगाच्या अधिकाऱ्यांऐवजी मतदारांवर टाकण्यात आल्याची टीका करण्यात येत आहे. याच कारणामुळे अनेक कायदेतज्ज्ञांनी याला 'reverse burden' असे संबोधले आहे.

### नोटीस, सुनावणी आणि नैसर्गिक न्याय

मतदाराचे नाव वगळण्यापूर्वी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम २२ नुसार संबंधित तथ्यांची योग्य पडताळणी करणे आणि संबंधित व्यक्तीला सुनावणीची वाजवी संधी देणे आवश्यक आहे. या संदभार्तील प्रक्रियात्मक तरतुदी मतदार नोंदणी नियम, १९६० मधील नियम २१अ मध्येही नमूद करण्यात आल्या आहेत. सुनावणीचा अर्थ केवळ हरकत घेण्याची संधी असा नाही. त्यासाठी संशयित मतदाराला नोटीस दिली पाहिजे. त्यामध्ये कारणे सांगितली पाहिजेत. त्याचबरोबर संबंधित मतदारांना उत्तर देण्याची वाजवी संधी देणे आवश्यक आहे. तसेच सुनावणीनंतर करण्यात आलेल्या निर्णयाची लेखी माहिती त्या मतदाराला दिली जाणे अपेक्षित आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करण्याच्या दृष्टीने देखील असे करणे अत्यावश्यक आहे. दुसऱ्या बाजूचे म्हणणे ऐका, हा न्यायाचा मूलभूत नियम आहे. प्रशासकीय सोय, वेळेची मयार्दा किंवा मोठ्या प्रमाणावरील कारवाई यासारखी कारणे पुढे करून आयोगाला नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करणे टाळता येणार नाही.

### अधिकाराचा आणि अधिकाराच्या वापराचा प्रश्न

एसआयआरसंबंधीच्या चर्चेत अनेकदा दोन वेगळे प्रश्न एकत्र केले गेले. पहिला प्रश्न होता की, निवडणूक आयोगाला एसआयआर राबवण्याचा अधिकार आहे काय? त्याच्याशी जोडून दुसरा प्रश्न विचारला पाहिजे की, तो अधिकार वापरताना कायद्याच्या आणि राज्यघटनेच्या मयार्दा पाळल्या गेल्या काय? पहिल्या प्रश्नाचे उत्तर अर्थातच होकारार्थी आहे. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मात्र अधिक गुंतागुंतीचे आहे. लोकशाहीमध्ये अधिकाराचा स्रोत जितका महत्त्वाचा असतो तितकेच महत्त्व तो अधिकार कशा पद्धतीने वापरला गेला आहे, यालाही आहे. वरील निरीक्षणांवरून आयोगाने आपले अधिकार लोकशाहीच्या तत्त्वाला अनुसरून वापरले, असे निर्विवादपणे म्हणता येणार नाही.

मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने मतदारयादी शुद्ध आणि अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने निवडणूक आयोगाला आवश्यक ते कायदेशीर अधिकारही आहेत. परंतु त्या अधिकारांचा वापर करताना पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार बाधित होणार नाही, याची काळजी घेणे ही आयोगाची घटनात्मक जबाबदारी आहे.त्यामुळे एसआयआर ची खरी कसोटी केवळ 'आयोगाला हा अधिकार आहे काय?" ही नसून, "हा अधिकार वापरताना कायद्याची प्रक्रिया, नैसर्गिक न्याय आणि मताधिकाराचे संरक्षण यांचा योग्य समतोल राखला गेला काय?' ही आहे. कारण अपात्र मतदारांना वगळणे गरजेचे असले, तरी एकाही पात्र नागरिकाला मतदानापासून वंचित ठेवणे हे लोकशाहीसाठी अधिक गंभीर संकट आहे.

# आयुष्यात रिटेक नाही......

माणसांना माणसांचा भरवसा असला, की देवाची आठवण फारशी होत नाही असं काही तरी असेल का? आमची तिथेच बोंब आहे ना.. म्हणून असेल कदाचित. आपले सर्वजन जवळ असतात तेंव्हा आठवण कुनाचीच येत नाही. पण नाती, माणसं खुपच महत्त्वाची असतात. त्यांची किंमत वेळ निघुन गेल्यावर कळते. विरहानं प्रेम वाढतं हे खरं असलं, तरी ते प्रेम व्यक्त करायला पुन्हा भेटायची संधी जर मिळाली तरच अर्थ आहे ना? पण विरहाचं रुपांतर वियोगातच झालं तर....? नाती, माणसं असतात तोवर किती निष्काळजी आणि बेफिकीर असतो ना आपण! जेव्हा परतायच्या वाटाच बंद होतात, तेव्हा कळते त्याची किंमत. पण तोवर काळानं पान उलटलेलं असतं आणि ... आणि आपल्या हातात फक्त आठवणींच्या जखमांचं दान असते...म्हणूनच, या जन्माचा प्रत्येक क्षण आसुसून जगायला हवा. पूर्णविरामाचा क्षण, कुणास ठाऊक कधी राहील पुढे उभा! सकाळी उठताना कंटाळा येतो? मग करून बघा विचार, सगळ्यांच्याच नशिबात कुठे असा सूर्य कुणी बिचारा झोपेतच जगाचा निरोप घेतो ... मग बिछाना सोडून ताडकन उठावंसं वाटेल. आळसाला रामराम ठोकावासा वाटेल. नोकरीवर जायचा कंटाळा आला तर जरूर आठवा ती बेरोजगारांची रांग. स्वयंपाकाचा कंटाळा आला तर आठवावी खपाटीला गेलेली पोटं. अभ्यासाचा कंटाळा आला तर डोळ्यासमोर आणावी ती अर्धनग्न कळकट मुलं, ज्यांना भीक मागण्यासाठी हात पसरावे लागतात सतत. त्यांच्या हातात कुठून येणार पाटी? मिळत असून नाकारणारी, कंटाळणारी आपलीच कपाळकरंटी ... भूतकाळ माझा नाही. भविष्यावर अधिकार नाही. पण वर्तमानातला प्रत्येक क्षण फक्त माझ्यासाठीच आहे. म्हणून तर वर्तमानाला इंग्लिशमध्ये प्रेझेंट म्हणतात. हे प्रेझेंट, हे बक्षीस, आपण सर्वार्थानं उपभोगायला हवं. सजगतेनं जगायला हवं ना.... सुदृढ शरीराचा लाभ न घेता व्यसनाधीन होऊन छातीचं खोकं आणि किडनीची चाळणी करणारी मंडळी पाहिली की, अस्वस्थ व्हायला होतं. एकत्र कुटुंबाला भाऊबंदकीची किड लागते, तेव्हा वाईट वाटते. आपला सगळा राग मुलांवर काढणारे पालक दिसले की, विचारावंसं वाटतं, मुलं नसण्याचं दुःख पदरी नाही, याचा आनंद मानायचा सोडून, असलेल्या सुखावर हात कसा उगारता तुम्ही अरसिक नवरा किंवा बायको पाहिले की त्यांना लग्नासाठी झुरणारी मंडळी दाखवावीशी वाटतात...

आई-वडिलांना दुखावणाऱ्यांना अनाथालयात न्यावंसं वाटतं. सतत रडवेला मुखडा घेऊन जगणाऱ्यांना हॉस्पिटलला व्हिजिट द्यायला पाठवावंसं वाटतं. जगण्याचा कंटाळ आलाय असं म्हणत, इतरांना कंटाळा आणणाऱ्यांना कॅन्सरशी झुंजणाऱ्या पेशंटना भेटवावसं वाटतं. श्रीमंतांच्या श्रीमंतीचा हेवा करत कुढणाऱ्यांना, इस्टेटीच्या वादावरून झालेला रक्तरंजित इतिहास वाचून दाखववासा वाटतो. आरोग्याकडे दुर्लक्ष करणारे लोक आपल्या आजुबाजूला बरेच दिसतात. त्यांना आयुष्याची, शरीराची किंमत कळत नाही. मित्रांनो, जर तुमच्या शरीरातला एखादा अवयव कामातून गेला तर तो पुन्हा नैसर्गिक बनवणे खूप कठीण होऊन बसते. आणि पुन्हा आधीसारखे सशक्त व्हायला जो खर्च येतो तो पण प्रत्येकाला करणे शक्य असेलच असे नाही. म्हणूनच मंडळी, शरीरातील प्रत्येक अवयव महत्वाचा आहे. अपूर्ण इच्छांच्या पूर्ततेची हमी दशक्रिया विधीच्या वेळी देऊन पिंडाला कावळा शिवावा म्हणून प्रार्थना करण्यापेक्षा ती व्यक्ती जिवंत असतानाच तो आपलेपणा आणि विश्वास दिला गेला असेल तर.. शूटिंगमध्ये शॉट चांगला झाला नाही तर रिटेक करतात. म्हणजेच पुन्हा तोच सीन करतात. पण आयुष्यात असे रिटेक घेता येत नसतात. म्हणूनच प्रत्येक क्षणी वन टेक ओके व्हावा इतकं प्रसन्न जगलं तर ...? खरच प्रत्येकाचे आयुष्य किती सुंदर होईल.....

**प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी**
9226144836 अकलूज.
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

# दुष्काळग्रस्त भागातील पशुपालकांसाठी दिलासा; चारा बियाणे वाटपाच्या अटी शिथिल

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात २०२६-२७ मध्ये कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या ३०४ तालुक्यांतील पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या अटी शिथिल केल्या आहेत. चारा टंचाईवर मात करण्यासाठी या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी तसेच शेतकरी गटांना अतिरिक्त चारा बियाणे व ठोंबे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही सवलत केवळ २०२६-२७ या वर्षासाठी लागू राहणार आहे.

योजनेच्या ९ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, वैयक्तिक लाभार्थ्याकडे स्वतःचे किमान तीन ते चार पशुधन असणे आवश्यक होते. मात्र, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन ही किमान पशुधनाची अट चालू वषार्साठी शिथिल करण्यात आली आहे.

### वैयक्तिक लाभार्थ्यांना ४ हजार रुपयांचे चारा बियाणे

योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना एक हेक्टर क्षेत्राच्या मयार्देत १०० टक्के अनुदानावर चार हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. संबंधित लाभार्थ्याकडे चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्यास आणि प्रथमच लाभ मागणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्यास, एकापेक्षा अधिक वेळा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### शेतकरी गटांना २० हजार रुपयांपर्यंत लाभ

शेतकरी समूह किंवा गटांना पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर २० हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असलेल्या गटांना, प्रथमच लाभ मागणाऱ्या अर्जदारांची मागणी पूर्ण झाल्यानंतर, उपलब्धतेनुसार एकापेक्षा अधिक वेळा बियाणे वाटप करता येणार आहे.

सर्वसाधारणपणे ही योजना वषार्तून एकदाच राबविण्यात येते. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती विचारात घेऊन चारा उत्पादनासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्याची खातरजमा केल्यानंतर अतिरिक्त लाभ देण्याची सवलत देण्यात आली आहे. यासाठी संबंधित उपायुक्त पशुसंवर्धन यांनी पाणीसाठा उपलब्ध असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे. तसेच, प्रथमच लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हा व विभागीय कार्यालयांना देण्यात आले आहेत.

योजनेबाबत अधिक माहितीसाठी पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर क्रमांकावर किंवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सअॅप चॅटबॉट क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

'दुष्काळजन्य परिस्थितीत पशुपालकांना आर्थिक दिलासा देणे आणि चाऱ्याचा तुटवडा जाणवू न देणे यासाठी शासन कटिबद्ध आहे. अटी शिथिल केल्यामुळे सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त चारा उत्पादन घेता येईल. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत,ह्व असे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

# वाचनातून ज्ञानसमृद्ध व्यक्तिमत्त्व घडते- प्रा. डॉ. भगवानराव साळुंखे



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात मराठी विभाग व ग्रंथालय विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्त ग्रंथप्रदर्शन, प्रकट अभिवाचन आणि जर्नल स्टँडचे उद्घाटन असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे होते. यावेळी भूगोल विभागप्रमुख डॉ. बी. टी. निकम, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. उत्तम सावंत आणि ग्रंथपाल प्रा. दिलीप शिंदे उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले. ज्ञान हीच सर्वात मोठी संपत्ती असून, ज्ञानामुळे समाजाची आणि व्यक्तिमत्त्वाची प्रगती होते. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील पुस्तके व नियतकालिकांचे नियमित वाचन करावे आणि वाचनासोबत लेखनाचीही सवय लावावी, असे आवाहन त्यांनी केले.डॉ. कमल कांबळे यांनी 'महात्मा ज्योतिराव फुले यांचे साहित्य' या विषयावर मार्गदर्शन केले. महात्मा फुले यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांवर प्रकाश टाकत शैक्षणिक व सामाजिक प्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले, असे त्यांनी सांगितले.यावेळी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जर्नल स्टँडचे उद्घाटन करण्यात आले. सिद्धेश कुलकर्णी (अकरावी कला), साहिल लांडगे, नूतन बागल आणि श्रद्धा भोसले (अकरावी वाणिज्य) या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला ग्रंथ भेट दिले. विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या साहित्याचे प्रकट अभिवाचन केले. तसेच यानिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. श्रीकांत पवार, मराठी विभागप्रमुख डॉ. सुनीता सूर्यवंशी, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संभाजी बनसोडे, प्रा. पुष्पा सस्ते, प्रा. नितीन देशपांडे, ज्ञानेश्वर बोराटे, नागराज करपे, संध्या सूर्यवंशी, मोनिका देशमाने यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. दिलीप शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पुष्पा सस्ते यांनी केले, तर आभार प्रा. उत्तम सावंत यांनी मानले.

# खरीप 2026 मध्ये 3.32 लाख पीक विमा अर्ज

## २.४१ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** खरीप हंगाम २०२६ मध्ये पीक विमा योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला असून, विविध आठ पिकांसाठी एकूण ३ लाख ३२ हजार ६७० अर्ज प्राप्त झाले आहेत. या अर्जाद्वारे ३ लाख ९२ हजार ५४६ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी २ लाख ४१ हजार ८०६ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. पेरणी क्षेत्राच्या तुलनेत विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ६२ टक्के असून, या पिकांसाठी एकूण ६६.४० कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

### सोयाबीनसाठी सर्वाधिक सहभाग

पीकनिहाय आकडेवारीनुसार सोयाबीन पिकासाठी सर्वाधिक ९४ हजार ४८७ अर्ज प्राप्त झाले आहेत. या पिकाचे १ लाख ३४ हजार ३१९ हेक्टर पेरणी क्षेत्र असून, त्यापैकी ८७ हजार १९५ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. पेरणी क्षेत्राच्या तुलनेत विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ६५ टक्के आहे. सोयाबीनसाठी ४०.४६ कोटी रुपयांचा एकूण विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

तूर पिकासाठी ७८ हजार ४१६ अर्ज प्राप्त झाले असून, ७६ हजार ४२६ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी ५९ हजार ९४५ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. या पिकाचे विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ७८ टक्के असून, एकूण विमा हप्ता २.५२ कोटी रुपये आहे.

मका पिकासाठी ५२ हजार ५१४ अर्ज प्राप्त झाले आहेत. ८२ हजार ८०५ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी ३३ हजार १०४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले असून, त्याचे प्रमाण ४० टक्के आहे. या पिकासाठी ०.३३ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

### उडीद, मूग, भुईमूग आणि कांदा पिकांचाही समावेश

उडीद पिकासाठी ३२ हजार ४५४ अर्ज प्राप्त झाले आहेत. ४० हजार २६७ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी २० हजार ४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले असून, त्याचे प्रमाण ५० टक्के आहे. या पिकासाठी १.०८ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

मूग पिकासाठी ७ हजार ५३५ अर्ज प्राप्त झाले असून, ५ हजार ३४३ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी ३ हजार ८०६ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. या पिकाचे विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ७१ टक्के असून, विमा हप्ता ०.५१ कोटी रुपये आहे.

भुईमूग पिकासाठी १ हजार ८३९ अर्ज प्राप्त झाले आहेत. २ हजार ९८८ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी १ हजार २७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले असून, त्याचे प्रमाण ३४ टक्के आहे. या पिकासाठी ०.२२ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

बाजरी पिकासाठी ३८ हजार ६७८ अर्ज प्राप्त झाले असून, १७ हजार ५१९ हेक्टर पेरणी क्षेत्रापेक्षा अधिक म्हणजे २२ हजार ७४२ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित असल्याची नोंद आहे. त्यामुळे विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण १३० टक्के दर्शविण्यात आले आहे. या पिकासाठी ०.३१ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

कांदा पिकासाठी २६ हजार ७४७ अर्ज प्राप्त झाले असून, ३२ हजार ८७९ हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी १३ हजार ९८४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. विमा संरक्षित क्षेत्राचे प्रमाण ४३ टक्के असून, या पिकासाठी २०.९८ कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

### एकूण ६६.४० कोटी रुपयांचा विमा हप्ता

खरीप २०२६ मध्ये पीकनिहाय प्राप्त अर्ज, पेरणी क्षेत्र, विमा संरक्षित क्षेत्र आणि विमा हप्ता यांची आकडेवारी पीक विमा योजनेतील शेतकऱ्यांच्या सहभागाचे चित्र स्पष्ट करते. एकूण आठ पिकांसाठी ३ लाख ३२ हजार ६७० अर्जाद्वारे २ लाख ४१ हजार ८०६ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. या सर्व पिकांसाठी एकूण ६६.४० कोटी रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

# तडवळे येथे महावितरणाच्या विरोधात रास्ता रोको आंदोलन



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे हे राज्यात शिक्षणाच्या बाबतीत गाजलेले तडवळा पॅटर्न म्हणून ओळखले जाणारे एक मेव गाव असून गावातील दर साल किमान एक डझन तरी विद्यार्थी नवोदय परीक्षा पात्र ठरतात. या गावाला वेठीस धरून जवळपास 50 दिवस झाले गावात सायंकाळी 6 च्या दरम्यान लाईट जाते ते सायंकाळी आठ नऊ वाजेच्या सुमारास येते. तडवळे सब स्टेशन वरती दोन दिवसा पूर्वी कुलूप लावून निषेध व्यक्त करून पण काही फरक न पडल्याने गावकरी रस्त्यावर उतरले. एक तास रास्ता रोको आंदोलन करून प्रशासन, शासनाचा निषेध करण्यात आला. निसर्गाने साथ सोडली वरून महावितरण,शासन आम्हाला मुद्दाम वेठीस धरून गावातील नागरिकांना हकनाक त्रास देत आहे आहे असे आंदोलकांचे म्हणणे आहे.गावाला लाईट सुविधा व्यवस्थित उपलब्ध करून देण्यात यावी तसेच पुढील काळात असेच चालत राहिले तर अजून आम्ही आंदोलने त्रिव करू असे आवाहन ग्रामपंचायत सदस्य सुभाष धनके यांनी केले आहे. या वेळी उपसरपंच हरून शेख, सदस्य धनाजी होगले, राजाभाऊ लोंढे, विशाल जमाले यांनी अमर शेख, उपकार्यकारी अभियंता तेर विभाग, श्याम जाधव सहाय्यक अभियंता धाराशिव यांना निवेदन दिले.या वेळी दोन्ही बाजूला वाहनाच्या रांगाचं रांगा लागल्या होत्या.या आंदोलनाला गावातील मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

# जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 : प्रशासकीय मान्यतेस 30 नोव्हेंबर 2026 पर्यंत मुदतवाढ

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2026-27 अंतर्गत कामांना / योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या मुदतीत शासन मान्यतेने दि. 30 नोव्हेंबर, 2026 पर्यंत वाढ करण्यात आली आहे. नियोजन विभागाच्या दि. 1 ऑगस्ट 2025 च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता माहे जून अखेरपर्यंत देण्याची तरतूद आहे. नियोजन विभागाच्या दि. 30 जुलै, 2026 रोजीच्या पत्रान्वये राज्यात मे 2026 ते जून 2026 या कालावधीत विधान परिषदेच्या (स्थानिक स्वराज्य संस्था) आदर्श आचारसंहितेमुळे परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न होणे, जिल्हा नियोजन समितीची सभा आयोजित करणे शक्य न होणे व तांत्रिक मान्यता विहित वेळेत प्राप्त न होणे या कारणास्तव ही मुदत प्रथम "एकवेळची विशेष बाब" म्हणून सप्टेंबर 2026 पर्यंत वाढविण्यात आली होती. आता एल-निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती तसेच पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागात पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असल्याच्या पार्श्वभूमीवर नियोजन विभागाच्या शासन निर्णयानुसार ही मुदत 30 नोव्हेंबर 2026 पर्यंत वाढविण्यात आली आहे.

या वाढीव मुदतीत केवळ प्राधान्याने करावयाच्या 13 प्रकारच्या कामांनाच प्रशासकीय मान्यता देता येणार असून यामध्ये - 1) जलसंधारण, नाला खोलीकरण, 2) मृदसंधारण, 3) जलयुक्त शिवार, 4) शिवकालीन बंधारे, 5) पाणीपुरवठा योजनांनजीक रिचार्ज शाफ्ट / जलस्रोत बळकटीकरण, 6) कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना फळ्या टाकणे, 7) बंधाऱ्यांचे बळकटीकरण, 8) शासकीय, जिल्हा, उपजिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांतील मूलभूत सुविधांची देखभाल-दुरुस्ती (नवीन बांधकामे वगळून), 9) शासकीय निवासी शाळा, आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, आयटीआय, महाविद्यालयांतील देखभाल-दुरुस्ती, 10) वैरण विकास, 11) कृषी व संलग्न कामे, 12) ग्राम विद्युतीकरण व सौर ऊर्जेवर आधारित विद्युतीकरण, 13) स्मशानभूमी दुरुस्ती यांचा समावेश आहे.

या पार्श्वभूमीवर ज्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिमेंटचा वापर होतो अशी गटारे व इतर तत्सम कामे या वाढीव कालावधीत घेता येणार नाहीत. प्रामुख्याने कॉँक्रीट रस्ते, सांडपाणी, निचरा योजनांना प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही स्वतंत्र परिपत्रकांनुसार करावी. तसेच पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागांमध्ये पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे व आचारसंहितेच्या कोणत्याही तरतुदीचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

## वात्रटिका

### पदवीधर मतदार

सामान्य मतदार सोडा
पदवीधर सुद्धा चुकतात...
मतदान करतात जोमाने,पण
त्यांचीही मतं बाद होतात...
धाऊन आले काहीजण इथे
करायला कोणाचा प्रचार...
पण कळले आहे आता की
यादीतून नाव त्यांचेच पसार...

**हणमंत पडवळ**
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाचा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना २ लाख ५१ हजारांचा मदतीचा हात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने २ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांच्या ५१ व्या वाढदिवसानिमित्त हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांनी वाढदिवसानिमित्त जाहिरातबाजी, बॅनरबाजी आणि अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन केले होते. वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरा करण्याऐवजी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढे यावे, शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे आणि मदतीच्या माध्यमातूनच वाढदिवसाच्या शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन त्यांनी हितचिंतक व कार्यकर्त्यांना केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत



मंडळाने शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात पुढे केला. यावेळी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाने घेतलेला पुढाकार प्रेरणादायी असून, मंडळाचे सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे. भाजपा नगरसेवक किसन जाधव म्हणाले, राज्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर झाली असून महायुती सरकार शेतकऱ्यांच्या मदतीसाठी खंबीरपणे उभे आहे.

पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांनी वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत ईच्छा भगवंताची परिवाराचे संस्थापक तथा आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव, माजी नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड, नगरसेविका सौ अंबिका नागेश अण्णा गायकवाड, ॲड. अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाने आणि सोलापूर शहर मध्यचे दमदार युवा आमदार देवेंद्रदादा कोठे यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाने, पाणीदार आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांसाठी २ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी महापौर विनायकदादा कोंड्याल, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण, नगरसेविका सौ चैत्रालीताई शिवराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड आदींची उपस्थिती होती. ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाचा हा उपक्रम शेतकऱ्यांना दिलासा देणारा आहे. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांना दीर्घायुष्य लाभावे आणि राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे लवकरात लवकर निवारण व्हावे, यासाठी किसन जाधव यांनी सोलापूरची ग्रामदैवता कुलस्वामिनी श्री रूपाभवानी मंदिरात अभिषेक व महाआरती करून देवीचरणी साकडे घातले. याप्रसंगी नगरसेविका सौ. चैत्राली ताई शिवराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, श्रीकांत गिड्डे, वसंत कांबळे, माणिक कांबळे, महादेव राठोड, सागर गायकवाड, संजय राजपूत, नागराज गायकवाड, यल्लाप्पा शिवपुरे आदींची उपस्थिती होती. यावेळी किसन जाधव यांनी राज्यात सुख-शांती नांदावी आणि शेतकऱ्यांवरील संकट दूर व्हावे, अशी प्रार्थनाही त्यांनी केली.

# मतदान अवैध ठरणार नाही, यासाठी मतदारांमध्ये जनजागृती करा : शितल तेली- उगले

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानाची प्रक्रिया अचूक व नियमानुसार पार पडावी, तसेच मतदान अवैध ठरणार नाही, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी मतदारांमध्ये मतदान पद्धतीबाबत जनजागृती करावी. मतदार यादीतील दुबार नोंदींची पडताळणी करून संबंधित मतदाराने एकाच ठिकाणाहून मतदान करेल, याची दक्षता घ्यावी. तसेच मतदान व मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिले.

पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत विभागीय आयुक्त शितल तेली-उगले बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत




पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नागेश सुरवसे, मनपा अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कसेकर, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, सदाशिव पडदुने, सुमित शिंदे, विजया पांगारकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपागर, जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका) आशिष लोकरे, यांच्यासह सर्व तहसीलदार उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती तेली पुढे म्हणाले की, मतदान प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी मतदारांना मतदान कसे करावे, याबाबत योग्य मार्गदर्शन करावे. मतदान करताना मत अवैध ठरणार नाही, यासाठी मतदारांमध्ये जागृती करावी. मतदार यादीमध्ये दुबार नोंदी आढळल्यास त्यांची अचूक पडताळणी करून नियमानुसार कार्यवाही करावी. संबंधित मतदाराने एकाच ठिकाणाहून मतदान करावे, यासाठी आवश्यक समन्वय साधावा, असे निर्देश त्यांनी दिले.

पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान, तर २७ ऑक्टोबर २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुकीसाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निर्धारित प्रशिक्षण पूर्ण करावे. प्रशिक्षणादरम्यान देण्यात आलेल्या सूचनांचे मतदान केंद्रांवर तसेच मतमोजणीच्या ठिकाणी काटेकोरपणे पालन करावे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमांनुसार पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन म्हणाले की, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी सोलापूर जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी ११७ व शिक्षक मतदारसंघासाठी ७६ अशी एकूण १९३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून ४९ हजार ७२२ पदवीधर व १५ हजार ३०३ शिक्षक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. दि. २३ ऑक्टोबर रोजी मतदान व २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असून सर्व नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती, स्ट्राँग रूम, वाहतूक व्यवस्थेचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी सर्व मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले.

# सुनेत्रा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अनाथ मुले, मनोरुग्णांसोबत स्नेहभोजन

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार विक्रम काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहन सुरवसे पाटील यांच्या वतीने उंड्री येथील 'आसरा - अनाथांचा हक्काचा निवारा' या संस्थेत स्नेहभोजन आणि फळवाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. या आश्रमात राहणाऱ्या अनाथ मुलांसह मनोरुग्ण व्यक्तींना स्नेहभोजन देऊन त्यांच्यासोबत वेळ घालविण्यात आला. तसेच संस्थेच्या कार्याला हातभार लावण्यासाठी आर्थिक मदतही देण्यात आली.

वाढदिवसाचे औचित्य साधून रोहन सुरवसे पाटील यांनी आश्रमातील मुलांशी आणि मनोरुग्ण व्यक्तींशी संवाद साधला. त्यांच्या गरजा आणि अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या वेळी सर्वांना गोडधोड भोजन देण्यात आले,




तसेच फळांचे वाटप करण्यात आले. केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर प्रेम, आपुलकी आणि भावनिक आधार देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

आश्रमातील अनाथ मुलांचे शिक्षण, संगोपन आणि मनोरुग्ण व्यक्तींची देखभाल यांसाठी संस्थेच्या वतीने करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहितीही सुरवसे पाटील यांनी घेतली. संस्थेच्या संचालिका स्वाती डिंगळे यांनी आश्रमाच्या कामकाजाची माहिती देताना मुलांचा दैनंदिन दिनक्रम, शिक्षण, संगोपन तसेच मनोरुग्ण व्यक्तींची काळजी घेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी सांगितले. या प्रसंगी विशाल विहिरे, रणजित शिंपले आणि प्रसाद पाटील उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आश्रमातील मुलांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

'अनाथ मुलांना आणि मनोरुग्ण व्यक्तींना आर्थिक मदतीसोबतच प्रेम, आपुलकी आणि भावनिक आधाराचीही गरज असते. समाजातील प्रत्येक घटकाने अशा व्यक्तींच्या पाठीशी उभे राहून त्यांना आधार देणे आवश्यक आहे. या मुलांच्या आणि गरजू व्यक्तींच्या पाठीशी आम्ही कायम उभे राहू,' असा विश्वास रोहन सुरवसे पाटील यांनी व्यक्त केला.

वाढदिवसासारख्या प्रसंगांचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम राबविणे आणि गरजू घटकांशी आपुलकीचे नाते निर्माण करणे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# मराठा मंडळातर्फे सोमवारी दसरा महोत्सवाचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाज सेवा मंडळाच्यावतीने दसरा महोत्सव व वैचारिक सीमोल्लंघन २०२६ अंतर्गत मराठा समाजातील नूतन नगरसेवकांचा सत्कार सोहळा सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता मुरारजी पेठेतील सरस्वती चौक परिसरातील छत्रपती शिवाजी प्रशालेच्या राजर्षी शाहू सभागृहातआयोजित करण्यात आला आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार असून, मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे हे अध्यक्षस्थानी असतील. याप्रसंगी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, आई शक्ती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या उपकुलगुरू डॉ. स्मिता जाधव आणि मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष सुभाष माने यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या वेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्यासह अमोल शिंदे, जयकुमार माने, वृषाली चालुक्य, वैशाली भोपळे, श्रध्दा पवार, विनोद भोसले, अनंत जाधव, गणेश वानकर, मनीष केत, मनोरमा सपाटे, प्रियदर्शन साठे , कल्पना कदम, पूनम काशीद, आणि मृण्मयी गवळी या नूतन १५ नगरसेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे.

मराठा समाज सेवा मंडळ ही संस्था १९६० पासून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहे. समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'शिवतीर्थ समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्याची परंपराही संस्थेने जपली आहे. यंदाच्या दसरा महोत्सवाच्या निमित्ताने नूतन नगरसेवकांचा गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे सरचिटणीस प्रा.महेश माने यांनी केले आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि. कि. अर्ज नं. १६५/२०२६

**मोहोळ येथील मे. ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट वर्ग १ सो, यांचे कोर्टात**

श्री. विश्वास विष्णु झुंजारे, वय - ४४ वर्षे, धंदा शेती. रा. सारोळे, पो. पोखरापुर, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

ग्रामपंचायत मनगोळी/भैरववाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर(अर्जाची नोटीस ग्रामसेवक मनगोळी/भैरववाडी,ता.मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलगी दिशा विश्वास झुंजारे हिचा जन्म ता. ०३/०७/२००८ रोजी अर्जदार यांची पत्नी सुरेखा विश्वास झुंजारे हिचे पोटी माहेर घरी मौजे मनगोळी/भैरववाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या मुलीचा जन्म दाखल्याची ता. २३/०९/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील जुलै २००८ चे अभिलेखात अर्जदार यांची मुलगी दिशा विश्वास झुंजारे हिचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. ८ /११ / २०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १६/१०/२०२६

क. लिपिक | कोर्टाचा शिक्का | सहा. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी कि. अर्ज नं. ५५/२०२६ नि.०६

**मोहोळ येथील मे. सिव्हिल जज्ज, ज्युनिअर डिव्हिजन सो, यांचे कोर्टात-**

१) सुरेखा विष्णु मोटे, वय ५२ वर्षे, धंदा- शेती, रा. नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर,
२) अक्षय विष्णु मोटे, वय-३१ वर्षे, धंदा- शेती, रा. नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर,
३) जोत्सना विष्णु मोटे, वय.२९ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर,
४) अरुणा माणिक गायकवाड, वय-३४ वर्षे, धंदा- शेती, रा. शेळगांव (आर), ता. बार्शी, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरुध्द**

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार हे वर अर्जातील नमुद पत्त्यावरील कायमचे रहिवासी आहेत. अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं. २ चे ४ वडील नामे विष्णु संदिपान मोटे हे महाराष्ट्र शासनाचे वनविभाग खातेमध्ये वर मजुर म्हणुन नोकरीस होते. ते ता.१३/८/२०२६ रोजी अपघातात मयत झाले आहेत. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे पश्चात मयत विष्णु संदिपान मोटे यांना अर्जदार नं. १ ते ४ हे कायदेशीर वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे मयत विष्णु संदिपान मोटे यांचे निधनानंतर प्रधानमंत्री विमा योजने अंतर्गत देय असणारी रक्कम रुपये २,००,०००/- अर्जदारांना मिळणेबाबत विष्णु संदिपान मोटे यांचे कायदेशीर वारस म्हणुन अर्जदार नं.१ ते ४ यांचे नांवे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील वर नमुद अर्जदार यांच्या व्यतीरिक्त मयत विष्णु संदिपान मोटे यांना अन्य कोणी वारस असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा दि.१७/११/२०२६ रोजी समक्ष अथवा वकोलामार्फत कोर्टात हजर राहून आपले म्हणणी मांडावेत. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणी अनंदार यांचे नांवे अर्जात नमुद रक्कम देणेबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची नोंद घ्यावी हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानोशी दिले असे ता. १७/१०/२०२६

लिपीक | शिक्का | सही/- सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, मोहोळ

# शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** रखडलेली नोकरभरती, अनुकंपा तत्त्वावरील रिक्त पदे आणि १०, २०, ३० वर्षांच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अंमलबजावणीसाठी सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनने शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांतील पात्र मतदारांनी या निर्णयात सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेने केले आहे.

राज्यात २०१३ पासून महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नोकरभरती झालेली नाही. अनुकंपा तत्त्वावरील पदेही रिक्त असल्याने महाविद्यालयांचे प्रशासकीय कामकाज अपुऱ्या मनुष्यबळावर सुरू आहे. दुसरीकडे, राज्यातील इतर शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाला असताना शिक्षकेतर कर्मचारी मात्र त्यापासून वंचित असल्याचे



संघटनेने म्हटले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी या मागण्यांबाबत अनेकदा आश्वासने दिली; मात्र त्यांची पूर्तता झालेली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही ठोस निर्णय होत नसल्याने शासनाच्या भूमिकेच्या निषेधार्थ मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

जिल्हाध्यक्ष दत्ता भोसले, सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजित संगवे, सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, उपाध्यक्ष आनंद व्हटकर आणि खजिनदार राहुल कराडे यांनी हे आवाहन केले आहे.

### आश्वासनांवर किती दिवस विश्वास ठेवायचा? : भोसले

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून ठोस निर्णय झालेला नाही. शिक्षणमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. नोकरभरती आणि अनुकंपा पदांचा प्रश्न प्रलंबित असताना प्रगती योजनेच्या लाभापासूनही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वंचित ठेवण्यात आले आहे. त्यामुळे निषेध म्हणून मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतल्याचे जिल्हाध्यक्ष दत्ता भोसले यांनी सांगितले.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने** मो. 9353370779

**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सतत कार्यरत राहणारा एक छोटा जीव २) एक उपदिशा ३) रात्रीच्या वेळचे जेवण (इंग्रजीत) ४) हिंदी चित्रपट निर्माता-** चोप्रा ५) इंदिरा गांधींच्या आईचे नाव-*** नेहरू ६) भीती (हिंदीत) ७) पोस्ट, पत्र ९) नव्वदच्या दशकातील हिंदी चित्रपटातील अभिनेत्री १०) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** ११) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो १२) संशय (हिंदीत) १३) मंत्र्यांच्या नावापुढे येणारे विशेषण १४) शक्तीमान, ताकद असलेला १५) वृक्षाच्या मुळ्या आणि फांद्या यांच्यामधील भाग १८) चिंच (हिंदीत) २०) क्रिकेट स्पर्धेसाठी वापरला जाणारा चेंडू-*** बॉल २१) महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर २५) नक्कल करणारा २७) एक म्हण-****** अक्कल नसते २८) श्रीरामाचा एक बंधू ३०) ख्रिश्चन धर्मसेविका ३२) नजीक, समीप ३४) हा चिरताना डोळ्यात पाणी येते ३५) यशाचे सूत्र, गुपित ३६) देवाचे चिंतन, नमस्कार ३७) पध्दत, रीत (हिंदीत) ३९) हिंदी न्यूज चॅनेल-** तक ४१) क्षण (हिंदीत) ४२) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात

**आडवे शब्द :** १) रिलायन्सचा आयपीएलमधील संघ ५) चवीला कडू असे ८) शन उलट लिहा ९) वय (हिंदीत)
१०) प्रतिष्ठीत, सन्माननीय १२) जुन्या हिंदी चित्रपटातील एक अभिनेत्री-*** टागोर
१३) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पत्र्याची पट्टी १४) दह्यात पाणी मिसळून बनविलेले पेय १५) सर्दी बरोबर हा येतो
१६) बशीचा जोडीदार १७) क्रिकेटमध्ये गोलंदाजाने बाहेरच्या बाजूस टाकलेला चेंडू, रूंद (इंग्रजीत) १९) तहसीलदार
२१) शपथ (हिंदीत)
२२) वस्तूचे मूल्य, भाव २३) गोधडी २४) मग्न, एकरूप
२६) टेकडी (हिंदीत) २९) मुलाची पत्नी, स्नुषा
३१) लाकूड कापताना होणारा आवाज ३२) जीभ, दिलेला शब्द (हिंदीत)
३३) एक दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेता ३५) गाणे गाणारा, गायक
३६) होकारच्या विरूध्दार्थी ३८) कपड्यावरील कचरा घाण
३९) आंब्याचा रस ४०) त्रास, फ्ल्यू (मराठीत)
४३) सलमान, संजय दत्त आणि माधुरी दीक्षित अभिनीत एक चित्रपट
४४) मुंबईतील हा गणपती प्रसिध्द आहे-**** चा राजा

## सुडोकु - 79

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | | |
| | 8 | 1 | | 9 | 3 | | 4 | 5 |
| 4 | | | | 5 | | | 3 | 2 |
| 9 | | | 5 | | 4 | | 7 | 8 |
| | 5 | 8 | 3 | | | | | 9 |
| | | | 8 | 2 | | | | |
| 5 | | | 2 | 7 | | | 8 | 4 |
| 6 | | 4 | 1 | 3 | 8 | 2 | | 7 |
| 8 | | 2 | 9 | | | 6 | | |

# शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी सत्ताधारी आमदाराची गरज - राजन पाटील

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** पुणे शिक्षक मतदारसंघातील भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार कौस्तुभ गावडे आणि पदवीधर मतदारसंघातील उमेदवार डॉ. स्मिता जाधव यांच्या प्रचारार्थ अनगर येथे आयोजित शिक्षक मेळाव्यास मोहोळ तालुक्यातील शिक्षक व शिक्षिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यात राष्ट्रीय शिक्षक मंचाने कौस्तुभ गावडे यांना पाठिंबा जाहीर केला.

भाजपचे निरीक्षक तथा धुळे येथील माजी आमदार कुणाल पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक निर्णय आणि शिक्षकांचे



प्रश्न मार्गी लावण्यासाठी सत्ताधारी पक्षाचा आमदार असणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासह शिक्षण क्षेत्रातील अडचणी दूर करण्यासाठी कौस्तुभ गावडे यांना प्रथम पसंतीचे मत द्यावे, असे आवाहन राजन पाटील यांनी केले.

शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा कणा असून त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन ते सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, सेवाविषयक अडचणी आणि शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या सोडविण्यासाठी कौस्तुभ गावडे सक्षमपणे काम करतील. शिक्षकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू, अशी ग्वाही माजी आमदार कुणाल पाटील यांनी दिली.

श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले यांनी प्रास्ताविक केले. सत्यवान दाढे यांनी सूत्रसंचालन केले, तर रामचंद्र पाटील यांनी आभार मानले.

या मेळाव्यास मोहोळ तालुका भाजपाध्यक्ष प्रकाश चवरे, सतीश आप्पा काळे, हनुमान बाप्पा पोटरे, प्रमोद आवताडे, प्राचार्य महादेव चोपडे, श्रीधर उन्हाळे, भिकाजी कुलकर्णी, शरद म्हमाने, माजी प्राचार्य सुधीर गायकवाड, प्राचार्य संतोष गायकवाड, मुख्याध्यापक विश्वजीत देशमुख यांच्यासह तालुक्यातील शिक्षक, शिक्षिका आणि विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगोला विधानसभा मतदारसंघात शिक्षक व पदवीधर निवडणुकीसाठी भाजपची जोरदार तयारी

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या आदेशानुसार व सभापती चेतनसिंह केदार सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सांगोला विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक २५ मतदारांमागे दोन कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली असून, मतदारांशी संपर्क साधण्यासाठी पक्ष संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

सांगोला विधानसभा मतदारसंघात पदवीधर मतदारांची संख्या ५,००८, तर शिक्षक मतदारांची संख्या २,०७७ आहे. यापैकी पदवीधर मतदारसंघातील २,१७१ मतदारांची नोंदणी आपल्या प्रयत्नांतून झाल्याचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या



अनुषंगाने सांगोला विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांची बैठक हॉटेल ज्योतिर्लिंग, वाढेगाव नाका, सांगोला येथे सांगोला विधानसभा प्रभारी मा.आमदार राजेश पाडवी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व सभापती चेतनसिंह केदार सावंत यांच्या प्रमुख उपस्थित पार पडली. या बैठकीत निवडणुकीच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार सौ. स्मिता जाधव आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार मा. श्री. कौस्तुभ गावडे यांना सांगोला विधानसभा मतदारसंघातून मोठी आघाडी मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

सांगोला विधानसभा मतदारसंघातील भाजपची संघटनात्मक यंत्रणा सक्रिय झाली असून, शिक्षक व पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक मतदाराशी संपर्क साधणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय राखणे आणि निवडणुकीच्या कामाला गती देणे यावर भर दिला जात आहे.

आगामी शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत दोन्ही उमेदवारांना भरघोस मताधिक्य मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते एकजुटीने प्रयत्न करतील, असा विश्वास सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे, बाळासाहेब एरंडे, शिवाजीराव गायकवाड, बाळासाहेब काटकर, गजानन भाकरे, नगरसेवक CA जुबेर मुजावर, मंडल अध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, मंडल अध्यक्ष विजय मगर, मंडल अध्यक्ष दादासाहेब खरात, सभापती पुनमताई इंगोले, रोहिणीताई पाटील-शेंडे, नगरसेविका तनुजाताई एरंडे, नगरसेविका वैशाली झपके, संगीताताई चौगुले, निवास येलपले सर, नवत्रे सर इ आदी मान्यवर भाजपा प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# VVPIET महाविद्यालयाच्या ५५ विद्यार्थ्यांची सेडमॅक मेकॅट्रॉनिक्स कंपनीत निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** व्ही.व्ही.पी.आय.ई.टी. (VVPIET) महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी (Electrical Engineering) आणि इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियांत्रिकी (Electronics & Telecommunication Engineering) या विभागांतील एकूण ५५ विद्यार्थ्यांची सेडमॅक मेकॅट्रॉनिक्स लिमिटेड, चाकण, पुणे या नामांकित कंपनीमध्ये वार्षिक ३.६ लाख रुपयांच्या वेतन पॅकेजवर निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ही रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये प्रशिक्षणार्थी (Intern) म्हणून काम करण्याची संधी मिळणार असून, त्यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात भर पडून त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांना चालना मिळणार आहे.

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देण्यासाठी श्ग्ढक्ग्ए्ळ महाविद्यालयाचा प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. विविध नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यावर महाविद्यालयाचा विशेष भर आहे.

या उपक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री. अमोल (नाना) चव्हाण, संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. जी. के. देशमुख, उपाध्यक्ष श्री. एम. एल. कटकरधोंड, प्राचार्य प्रा. डॉ. ए. एन. गायकवाड आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट प्रमुख प्रा. प्रसाद कुलकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे व्यवस्थापन, प्राचार्य, सर्व विभागप्रमुख व शिक्षकवृंद यांनी निवड झालेल्या सर्व ५५ विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# ऑर्किड स्कूलच्या विद्यार्थ्यांचा सोलापूर मध्ये जिल्हा स्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत २ सुवर्ण पदक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील नामांकित नागेश करजगी ऑर्किड स्कूल मधील विद्यार्थ्याने शालेय शहरस्तरीय सॉफ्ट टेनिस क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत प्रथम क्रमांक प्राप्त केले आहे.

या स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सोमपा क्रीडा कार्यालय सोलापूर शालेय शहरस्तरीय सॉफ्ट टेनिस क्रीडा स्पर्धेत सोलाउत्कृष्ट तांत्रिक खेळ, अष्टपैलु कामगिरी आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी प्रतिस्पर्ध्यावर मात करत 2 सुवर्ण पदक प्राप्त केलेले आहे. यामुळे रिषभ गोचडे व मृण्मयी



गायकवाड यांची होणाऱ्या विभाग स्पर्धे साठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा सौ. वषार्ताई विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, स्कूलच्या मार्गदर्शीका मीना पारखे, प्राचार्या रश्मी कुंभार यांनी शुभेच्छा दिल्या.

वरील सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा विभाग प्रमुख आनंद लिगाडे, ज्ञानदीप जाधव यांनी मार्गदर्शन केले.

# सौ. भू.म.पुल्ली कन्या प्रशालेत कन्यापूजन उत्साहात संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सौ. भू.म.पुल्ली कन्या प्रशालेत नवरात्रोत्सवानिमित्त कन्यापूजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सौ. विद्याताई दशरथ गोप होत्या.आणि सौ. हारिका श्रीनिवास गड्डम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यानंतर प्रशालेतील निवडक विद्यार्थिनींना हळद-कुंकू लावून, पुष्पगुच्छ देऊन व औक्षण करून त्यांचे विधिवत कन्यापूजन करण्यात आले. शाळेकडून विद्यार्थिनींना वही व पेन यांसारख्या शैक्षणिक साहित्य भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.प्रमुख पाहुण्यांनी देखील या मुलींना विशेष भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला.

नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर आयोजित या उपक्रमातून नारीशक्तीचा सन्मान, मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व आणि त्यांच्या सुरक्षिततेचा संदेश देण्यात आला. मुलींना शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि समाजात स्त्रीशक्तीचा सन्मान वाढावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

प्रमुख पाहुण्या सौ. विद्याताई दशरथ गोप यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थिनींना चांगले शिक्षण घेऊन स्वावलंबी बनण्याचे, स्वतःचा तसेच इतरांचा सन्मान करण्याचे आणि समाजाच्या प्रगतीत मोलाचे योगदान देण्याचे बहुमोल मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने जीवनातील आव्हानांना सामोरे जावे आणि शिक्षणाच्या माध्यमातून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

प्रमुख अतिथी सौ. हारिका श्रीनिवास गड्डम यांनी विद्यार्थिनींना ब्रतुकम्मा सणाचे महत्त्व विशद करून या सणामागील सांस्कृतिक परंपरा, निसर्गाशी असलेले नाते आणि स्त्रीशक्तीचा गौरव यांविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमास प्रशालेचे उपमुख्याध्यापक श्री. तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक श्री. परमेश्वर बाबळसुरे, सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. उमा कोटा यांनी तर आभार प्रदर्शन श्री. तुकाराम श्रीराम यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.संघमित्रा काकडे यांनी केले.

नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित हा कन्यापूजन सोहळा विद्यार्थिनींच्या सन्मानाचा, शैक्षणिक प्रगतीचा आणि स्त्रीशक्तीच्या गौरवाचा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

# विधान परिषद निवडणुकीची मतमोजणी अचूक, पारदर्शक व नियमानुसार पार पाडा : शीतल तेली-उगले

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** विधान परिषदेसाठी होणाऱ्या पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी. मतपत्रिकांवरील पसंतीक्रमानुसार मतमोजणीची प्रक्रिया असल्याने प्रत्येक टप्प्यावर विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिले.

पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने अल्पबचत भवन सभागृहात मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास सह आयुक्त संजय पलांडे, अपर जिल्हाधिकारी तथा महाऊजार्चे अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर यांच्यासह विभागातील अधिकारी तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मतमोजणीची प्रक्रिया वेळबद्ध असली, तरी घाई करून चुका करण्यापेक्षा प्रत्येक टप्पा नियमानुसार पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही एका कर्मचाऱ्याच्या चुकीमुळे संपूर्ण पथकाचे श्रम आणि वेळ वाया जाऊ शकतो. त्यामुळे सर्वांनी एकजुटीने आणि जबाबदारीच्या जाणीवेतून काम करावे. मतमोजणी प्रक्रियेत टेबलवरील पर्यवेक्षक, सहाय्यक,



संबंधित अधिकारी आणि माहिती संकलन करणाऱ्या पथकांमध्ये समन्वय असणे आवश्यक असल्याचे श्रीमती तेली-उगले यांनी सांगितले.

विधान परिषद निवडणुकीत मतपत्रिकांद्वारे पसंतीक्रमानुसार मतदान होत असल्याने मतमोजणीची प्रक्रिया ईव्हीएमवरील मतमोजणीपेक्षा वेगळी असते. त्यामुळे प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने प्रक्रियेतील बारकावे समजून घेऊन आपल्यावर सोपविलेली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी. मतमोजणीच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक पडताळणी करावी, नोंदी व्यवस्थित ठेवाव्यात आणि संबंधित मतमोजणी प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या घेण्याची दक्षता घ्यावी, असे विभागीय आयुक्तांनी सांगितले.

निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणादरम्यान आपल्या शंकांचे निरसन करून घ्यावे. मतमोजणीच्या दिवशी कोणतीही संदिग्धता राहू नये, यासाठी आवश्यक नियम, सूचना आणि कार्यपद्धतींचा अभ्यास करावा. निवडणूक कामकाजातील हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचेही विभागीय आयुक्तांनी स्पष्ट केले. शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांनी पुढील प्रशिक्षणात प्रत्यक्ष प्रक्रियेचा सराव करून मतमोजणीसाठी सज्ज राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

सह आयुक्त पलांडे यांनी प्रशिक्षणादरम्यान मतमोजणी प्रक्रियेचे विविध टप्पे, कामानुसार जबाबदाऱ्यांची विभागणी, नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये, वैध व अवैध मतपत्रिकांबाबतच्या तरतुदी, मतमोजणीच्या वेळी घ्यावयाची दक्षता तसेच निवडणूक आयोगाचे नियम व कार्यपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी आनंदकर म्हणाले, शिक्षक व पदवीधर मतदारसंघासाठी येत्या २६ ऑक्टोबर रोजी बालेवाडी येथे प्रत्यक्ष प्रशिक्षण होणार आहे. यामध्ये मतपेट्या उघडणे, ५० मतपत्रिकांचे गठ्ठे तयार करणे आणि मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया यांचे प्रात्यक्षिक देण्यात येणार आहे. मतमोजणी निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मतमोजणी प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यांबाबत त्यांनी माहिती दिली.

मतमोजणीची प्रक्रिया निर्धारित नियमांनुसार आणि काटेकोरपणे पार पाडण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणात विविध बाबी स्पष्ट करण्यात आल्या. मत मोजणी प्रक्रियेत सहभागी अधिकारी तसेच कर्मचारी यांनी विचारलेल्या प्रश्नांची देखील श्री पलांडे व श्री. आनंदकर यांनी उत्तरे दिली. यावेळी निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# लोप पावत चाललेली वाचन संस्कृती वृद्धिंगत करणे सामूहिक जबाबदारी- राजेंद्र गुंड

**माढा (कटूसत्य वृत्त):-** सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या व मोबाईलच्या युगात सातत्याने वाचन संस्कृती हळूहळू लोप पावत चाललेली आहे.ही बाब वैयक्तिक आणि देश हिताच्या दृष्टीने निश्चितच गंभीर व चिंताजनक आहे.वाचनाने मनुष्य शहाणा, ज्ञानी, संस्कारक्षम व निर्णयक्षम बनतो त्यामुळे लोप पावत चाललेली वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी क्रमिक पुस्तकांसह इतर ग्रंथ, पुस्तके व दर्जेदार साहित्य वाचनाची आवड व गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने शासन, प्रशासन शिक्षक, सुज्ञ व जागरूक नागरिक, पालक व विद्यार्थी यांनी कृतियुक्त प्रयत्नासह अमंलबजावणी करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर यांनी केले आहे.

ते आनंदनगर-मानेगाव ता.माढा येथील श्री संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या 15 ऑक्टोबर रोजीच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा व हात स्वच्छ धुवा दिन साजरा करताना अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

प्रास्ताविक माजी प्रभारी मुख्याध्यापक प्रविणकुमार लटके यांनी केले.

सुरुवातीला महान शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष आदर्श शिक्षक



राजेंद्र गुंड व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी क्रिडाशिक्षक सचिन क्षीरसागर व सागर राजगुरू यांनी साबणाने हात स्वच्छ धुण्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना करून दाखवले. यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यिनी ईश्वरी कापसे व अनुष्का गवळी यांनी मनोगत व्यक्त केले.सर्व विद्यार्थ्यांनी क्रमिक पुस्तकांसह इतर पुस्तकांचे सुमारे एक तास सामूहिक वाचन केले.

मुख्याध्यापक तुकाराम कापसे यांनी सांगितले की, डॉ.अब्दुल कलाम यांच्या कायार्चा आदर्श आजच्या पिढीने घेतला पाहिजे. भारताला महासत्ता बनविण्याचे त्यांचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत.शिक्षक व विद्यार्थ्यांनी दररोज लेखन व वाचनाची आवड जोपासली पाहिजे असे आवाहन केले.

यावेळी आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर यांनी सांगितले की, निरोगी शरीरातच निरोगी मन निवास करते तेंव्हा प्रत्येकाने शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी दररोज पहाटे व्यायाम व योगासने केली पाहिजेत.चांगले वर्तन व चांगल्या सवयी माणसाला यशाच्या शिखरावर नेतात. ज्यांनी देशासाठी चांगले काम केले आहे त्यांचा आदर्श व महान कार्य डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करावी.नेहमी मोठी स्वप्ने पहावीत व ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मुख्याध्यापक तुकाराम कापसे, प्रविण लटके, तनुजा तांबोळी, शिवाजी भोगे, सुनील खोत, सचिन क्षीरसागर, सागर राजगुरू यांच्यासह इयत्ता 5 वी ते 10 वीचे विद्यार्थी उपस्थित होते.

# 'अर्ध्या रात्री मदतीला येणाऱ्या उमेदवाराला मत द्या'

## दत्तात्रय सावंत यांच्या प्रचार पत्रकाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाची निवडणूक सध्या संपूर्ण महाराष्ट्रात लक्षवेधी ठरत असून, उमेदवारांच्या प्रचाराला प्रचंड वेग आला आहे. या निवडणुकीच्या रणधुमाळीत माजी आमदार आणि शिक्षकांचे लोकप्रिय नेते दत्तात्रय अच्युतराव सावंत यांच्या एका प्रचार पोस्टरने सध्या सोशल मीडिया आणि शिक्षक वतुर्ळात सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या या पोस्टरवर अत्यंत मार्मिक आणि मतदारांना विचार करायला लावणारा संदेश देण्यात आला आहे.

**पोस्टरमधील महत्त्वाचा संदेश:**

प्रसिद्ध झालेल्या पोस्टरवर "चला चला दिवाळी आली, सावंत सरांना शिक्षक आमदार बनवायची वेळ आली!" अशी मुख्य टॅगलाईन देण्यात आली आहे. यासोबतच, सद्यस्थितीतील राजकीय आणि निवडणूक संस्कृतीवर बोट ठेवत, "अर्ध्या रात्री पैसे देणाऱ्यांना नाही, तर अर्ध्या रात्री मदतीला येणाऱ्या उमेदवाराला मत द्या..!" असे जाहीर आवाहन शिक्षकांना करण्यात आले आहे.

**शिक्षकांच्या हक्काचा बुलंद आवाज:**

दत्तात्रय सावंत सर हे गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण चळवळीत सक्रिय असून त्यांनी शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर, जुनी पेन्शन योजना (OPS) आणि अशैक्षणिक कामांच्या विरोधात सातत्याने लढा दिला आहे. "शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी



शिक्षकच आमदार असायला हवा," अशी भावना मतदारसंघातून व्यक्त होत आहे.

**निवडणुकीत चौरंगी लढत, सावंत सरांचा विजयाचा दावा:**

पुणे, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या मतदारसंघात यंदा अत्यंत चुरशीची चौरंगी लढत पाहायला मिळत आहे. दरम्यान, "मतदारसंघातील ६२ हजार मतदारांपैकी तब्बल २५ हजारांहून अधिक शिक्षक थेट आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, पहिल्याच फेरीत आपला विजय निश्चित आहे," असा ठाम विश्वास सावंत सरांनी व्यक्त केला आहे.

दिवाळीच्या शुभमुहूर्तावर सावंत सरांच्या समर्थकांकडून हा प्रचार सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर शेअर केला जात असून, "अर्ध्या रात्री मदतीला धावून जाणारा हक्काचा आमदार" म्हणून शिक्षकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

# प्रताप क्रीडा मंडळाच्या बालक्रीडा स्पर्धेत १६८२ खेळाडूंचा सहभाग

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शंकरनगर-अकलूज येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी बालक्रीडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

या स्पर्धेचे उद्घाटन मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण, आकाशात कबुतरे सोडून व मैदान पूजनाने संपन्न झाले. तर सहकार महर्षी व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन बाल खेळाडूंनी केले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी दिपकराव खराडे




पाटील, महादेव अंधारे, हर्षवर्धन खराडे पाटील, उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिबीषन जाधव, मंडळाचे सर्व आजी-माजी संचालक, सदस्य प्रमुख उपस्थित होते. या स्पर्धेत तालुक्यातील १४ शाळांमधून सहा विविध खेळप्रकारात मुले व मुली असे एकूण १६८२ बाल खेळाडूंनी सहभाग घेतला.

**स्पर्धेतील गटनिहाय प्रथम तीन विजेते पुढील प्रमाणे -**

लहान गट - डोक्यावर चेंडू घेऊन पळणे (४० मी.) या गटात (मुली) अर्पिता बोरकर प्रथम, सानवी बनसोडे द्वितीय, यशस्वती खराडे पाटील तृतीय. (मुले) विवान कांबळे प्रथम, चरण शिंदे द्वितीय, शंभू चव्हाण तृतीय.

मोठा गट - धावणे (६०मी.) या गटात (मुली) संजीवनी मगर प्रथम,सान्वी होआळ द्वितीय, अनया रिसवडकर तृतीय. (मुले) कार्तिक कोडग प्रथम, शिवांश जाधव द्वितीय, तैमुर पठाण तृतीय.

इयत्ता १ ली कमरेवर हात ठेऊन उड्या मारत जाणे (४० मी.) (मुली) समायरा शेख प्रथम, स्वरा चव्हाण द्वितीय, रिया विटकर तृतीय. (मुले) मल्हार जाधव प्रथम, हर्ष बनसोडे द्वितीय, आलोक वराडे तृतीय.

इयत्ता २ री. लंगडी घालत जाणे (४०मी.) (मुली) अक्षरा गुरवे प्रथम, स्वरा शिंदे द्वितीय, शिवश्री भगत तृतीय, (मुले) निहाल गावकर प्रथम, वृषभ जाधव द्वितीय, शौर्य होवाळ तृतीय

इयत्ता ३ री. तीन पायाची शर्यत (४० मी.) (मुली) ईश्वरी कांबळे व नंदिनी यादव प्रथम, हिंदवी पेचे व रिया जानकर द्वितीय, मुक्ता माने देशमुख व आरोही चव्हाण तृतीय.

(मुले) आहान शेख व हसनैन शेख प्रथम, स्वरूप काळे व महेश शिंदे द्वितीय, कार्तिक पाटील व प्रणव भगत तृतीय

इयत्ता ४ थी.पोत्यात पाय घालून उड्या मारत जाणे (५० मी.)(मुली) सुप्रिया गोफणे प्रथम, सिमरन कोडग द्वितीय, स्वरांगी पाटील तृतीय.

(मुले) निरंजन पवार प्रथम, रुद्राक्ष खत्री द्वितीय, अरमान तांबोळी तृतीय. या खेळाडूंनी विजेतेपद पटकावले.

स्पर्धेतील या विजेत्या खेळाडूंना अनुक्रमे तीन चाकी सायकल, कॅरम बोर्ड, स्कुल बॅग, टिफिन बॉक्स, पाणी बोटल व प्रमाणपत्र असे एकुण पाच क्रमांकास बक्षिसे देण्यात आली. सर्व सहभागी खेळाडूंना खाऊ वाटप करण्यात आले. या वेळी स्पर्धाप्रमुख शिवाजी पारसे, भानुदास आसबे, संजय राऊत, अर्जुन बनसोडे, गणेश करडे सर्व पंच, क्रीडा शिक्षक, पालक, बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन आनंत कोळी,पोपट पवार यांनी केले आभार भानुदास आसबे यांनी मानले. सर्व समितीतील सदस्यांच्या अचूक नियोजनमुळे स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाली. ध्वजावतरण करून स्पर्धेचा समारोप झाला.

> लहान मुलांचे हे उपक्रम छोटे असले तरीही या स्पर्धेतून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल व भविष्यात यातूनच मोठे खेळाडू निर्माण होतील.
>
> **- जयसिंह मोहिते पाटील,** (संस्थापक अध्यक्ष, प्रताप क्रीडा मंडळ, शंकरनगर अकलूज)